| Seat No. | |
|---|---|

**Set P**

**एम.ए. (Prakrit) (सत्र – I) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा:**
**ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५**
**History of Prakrit Language (230119101)**

वार, दिनांक : बुधवार, २९-१०-२०२५ कमाल गुणः ६०
वेळः दुपारी ०३:०० ते ०५:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** १२

१) प्राकृत भाषेत लिखित ––– सामग्री सर्वात प्राचीन मानली जाते.
अ) शिलालेख ब) अपभ्रंश ग्रंथ
क) प्राकृत चरित्रग्रंथ ड) नाटक

२) बोलताना शब्दातील वर्णाची जागा बदलली जाते. त्यास ––– म्हणतात.
अ) वर्ण विपर्यय ब) साहो
क) समास ड) संधी

३) सम्राट अशोकांनी ––– भाषेत राजांज्ञा कोरवली आहे.
अ) कन्नड ब) संस्कृत
क) प्राकृत ड) अपभ्रंश

४) शब्दात परिवर्तन होऊन जे शब्द प्राकृत भाषेत आले त्यास ––– शब्द म्हणतात.
अ) देशी ब) तत्सम
क) विदेशी ड) तद्भव

५) भाषा विज्ञानाच्या दृष्टीने ––– प्राकृत संस्कृतच्या जवळची आहे.
अ) मागधी ब) अर्धमागधी
क) शौरसेनी ड) पैशाची

६) मध्ययुगीन प्राकृत मध्ये ––– चे महत्वपूर्ण स्थान आहे.
अ) शिलालेख ब) अस्त्र शस्त्र
क) मंदिर ड) स्तूप

७) संस्कृत प्राकृत पाली भाषामधील समान शब्दांना ––– शब्द म्हटले जाते.
   अ) देशी    ब) तत्सम
   क) तद्भव    ड) विदेशी

८) शौरसेनी प्राकृत भाषा ––– प्रदेशात बोलली जात होती.
   अ) काश्मीर    ब) मगध
   क) पिशाच    ड) शुरसेन

९) सामान्य लोकांची भाषा म्हणून ––– या भाषेत ओळखले जाते.
   अ) ब्राह्मी    ब) संस्कृत
   क) इंग्रजी    ड) प्राकृत

१०) सम्राट अशोकाने प्राकृत भाषेस ––– घोषित केले होते.
   अ) अर्थभाषा    ब) राज्यभाषा
   क) गणितभाषा    ड) ऋषिभाषा

११) आधुनिक भारतीय भाषांची जननी ––– भाषेस मानले जाते.
   अ) अपभ्रंश    ब) छांदस
   क) प्राकृत    ड) संस्कृत

१२) प्राकृत भाषेच्या विकासामध्ये अर्धमागधी भाषेस ––– म्हटले जाते.
   अ) प्रथमयुगीन    ब) तृतीययुगीन
   क) द्वितीययुगीन    ड) आधुनिक

**प्र.२ थोडक्यात उत्तरे द्या. (कोणतेही चार)** १२

**अ)** निया प्राकृत
**ब)** शिलालेख प्राकृत
**क)** तत्सम शब्द
**ड)** अंगप्रविष्ठ आगम
**इ)** महाराष्ट्री प्राकृत
**ई)** देशी शब्द

**प्र.३ थोडक्यात उत्तरे द्या. (कोणतेही दोन)** १२

**अ)** मध्ययुगीन आर्यभाषाकाळ विषयक माहिती द्या.
**ब)** अपभ्रंश प्राकृतची वैशिष्टये लिहा.
**क)** अर्धमागधी आगमाची माहिती द्या.
**ड)** प्राकृत व्याकरण विषयक माहिती सांगून त्यांच्या रचना सांगा.

**प्र.४ सविस्तर उत्तर लिहा. (कोणताही एक)** १२

**अ)** प्राकृत भाषेच्या प्रारंभापासून ते आधुनिक काळापर्यंतच्या विकासाची माहिती द्या.

**ब)** प्राकृत भाषेतील शब्दसंपदा याविषयी सविस्तर लिहा.

**प्र.५ सविस्तर उत्तर द्या.** १२

प्राकृत भाषेच्या उद्गमविषयीची विविध मतांची चर्चा करून तिचे स्वरूप स्पष्ट करा.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

# एम.ए. (Prakrit) (सत्र – I) (नवीन) (NEP CBCS) परीक्षाः
# ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५
# Ardhamagdhi Aagam (230119102)

वार, दिनांक : शुक्रवार, ३१-१०-२०२५ कमाल गुणः ६०
वेळः दुपारी ०३:०० ते ०५:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** **१२**

**१)** दिगंबर आगम साहित्याची भाषा ––– आहे.
अ) मागधी ब) शौरसेनी
क) महाराष्ट्री ड) पाली

**२)** आचारांगातील प्रथम अध्ययनाचे नाव ––– आहे.
अ) जीवाधिकार ब) द्रव्याधिकार
क) शस्त्रप्रतिज्ञा ड) अनेकांत खंड

**३)** व्याख्या प्रज्ञहित यालाच ––– म्हणतात.
अ) द्रव्यसंग्रह ब) वीरस्तव
क) आचारांग ड) भगवतीसूत्र

**४)** अंतिम श्रुतकेवली ––– आचार्य हे होते.
अ) भद्रबाहु ब) सुधर्म
क) गुणधर ड) कुंदकुंद

**५)** द्वादशांगातील द्वितीय अंगाचे नाव ––– आहे.
अ) आचारांग ब) सूत्रकृतांग
क) शस्त्रप्रतिज्ञा ड) लोकविचय

**६)** श्वेतांम्बर आगम ग्रंथाची भाषा ––– प्राकृत आहे.
अ) शौरसेनी ब) पैशाची
क) चूलिका ड) अर्धमागधी

**७)** निर्ग्रंथाच्या प्रायश्चिताचे व चारित्र्यशुद्धीच्या आवश्यकांचे वर्णन असलेल्या सूत्रास ––– म्हणतात.
अ) प्रकीर्णक ब) छेदसूत्र
क) उपांग ड) मूलसूत्र

८) रायपसेनीय उपागांत ––– सूत्रे आहेत.
अ) २१७ ब) ११७
क) १९0 ड) १९२

९) भावे कसायलोगो ––– तस्स विजएणं।
अ) अहिमारो ब) अहिगारो
क) मुणिणो ड) भविस्सामो

१0) आगमामध्ये ''त्राण'' चा अर्थ ––– आहे.
अ) रक्षा करणारा ब) मारणारा
क) जगविणारा ड) सोडणारा

११) अनुत्तर विमानात उत्पन्न होणाऱ्या विशिष्ट पुरूषांचे वर्णन येते त्यास ––– म्हणतात.
अ) अंतगडदसा ब) अनुत्तरोपपातिकदशा
क) आचारांग ड) उपासक दशा

१२) प्रथम पाटलीपुत्र वाचना ––– यांच्या नेतृत्त्वात संपन्न झाली.
अ) भद्रबाहु ब) स्थूलिभद्र
क) हरिभद्र ड) कुंदकुंद

**प्र.२ भाषांतर करा. (कोणतेही चार)** १२

**अ)** चत्तारिएस कसिणा कसाया, सिंचति मुलाइं पुणब्भवस्स।

**ब)** अप्पं च खलु आउं इहमेगेसिं माणवाणं। तं जहा सोतपण्णाणेंहि परिहायमाणेंहि चक्खुपण्णाणेहिं परिहायमाणेहिं घाणपण्णाणेहिं परिहायमाणेहिं रसपण्णाणेहिं परिहायमाणेहिं फासपण्णाणेहिं परिहायमाणेहिं।

**क)** इच्चेवं समुट्ठिते अहोविहाराए। अंतरं च खलु इमं संपेहाए धीरे मुहुत्तमणि णो पमावए। वओ अच्चेति जोव्वणं च।

**ड)** अरतिं आउट्टे से मेघावी खणंसि मुक्के।
अण्णाणाए पुट्ठा वि एगे णियट्ठंति मंदा मोहेण पाउडा।

**इ)** न सा जाई न सा जोणो न तं ठाणं न तं कुलं।
जत्थ न जाओ मओ वावि एस् जीवो अणंतसो।।

**ई)** आदाणियस्स आणाए तम्मि ठाणे ण चिट्ठई।
वितहं पप्पडखेत्तण्णे तम्मि ठाणम्मि चिट्ठइ।।

**प्र.३ टीपा लिहा. (कोणत्याही दोन)** १२

**अ)** शस्त्रप्रतिज्ञा

**ब)** लोकविचय

**क)** आचारांगाची प्राथमिकता

**ड)** चूर्णि

**प्र.४ दीर्घोत्तरी प्रश्न. (कोणताही एक)** १२

**अ)** आचारांगातील शस्त्रपरिज्ञा अध्ययन.

**ब)** अर्थमागधी आगम निर्मितीतील वाचनांची माहिती द्या.

**प्र.५ दीर्घोत्तरी प्रश्न.** १२

लोकविचय अध्ययनाचा सार सांगून महत्त्व सांगा.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

**एम.ए. (Prakrit) (सत्र - I) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा:**
**ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५**
**Nemichandra aani Dravyasangraha (230119103)**

वार, दिनांकः सोमवार, ०३-११-२०२५ कमाल गुणः ६०
वेळः दुपारी ०३:०० ते ०५:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** १२

१) 'द्रव्यसंग्रह' ग्रंथाची भाषा ––– प्राकृत आहे.
अ) मागधी ब) अर्धमागधी
क) शौरसेनी ड) पैशाची

२) तीर्थकर देव, वृषभदेव ––– इंद्रांनी वंदनीय आहेत.
अ) ६० ब) १००
क) ७० ड) ८०

३) जीवाचे लक्षण ––– आहे व मूळ प्राण ––– आहेत.
अ) चेतना – ४ ब) इंद्रिय – ५
क) मन – १ ड) प्राण – ३

४) तिक्काले चदुपाणा इंदियवलमाउ ––– य।
ववहारा सो जीवो ––– दु चेदणा जस्स।।
अ) आणपाणो – णिच्चयणयदो ब) उवओगो – बंधादो
क) ववहारदो – णिच्चयदो ड) असमुहदो – असंखदेसो

५) जीव व्यवहारनयाने ––– आहे.
अ) अमूर्तिक ब) मूर्तिक
क) स्कन्धात्मक ड) अणू

६) भूरव, तहान इत्यादि वेदना झाले नंतर सुद्धा शांत भावांनी सहन करणे यास ––– म्हणतात.
अ) गुण ब) पदार्थ
क) द्रव्य ड) परिषह मय

**७)** एक पुद्‌गल परमाणुं जितक्या आकाशास व्यापेल त्यास ––– म्हणतात.
अ) आकाश ब) अणु
क) प्रदेश ड) द्रव्य

**८)** लोकाच्या बाहेरच्या भागात फक्त आकाश आणि आकाशच आहे तेथे अन्य द्रव्य नाहीतच अशा मोकळया अवस्थेस ––– म्हणतात.
अ) पुद्‌गल ब) अणु
क) अजीव ड) अलेकाकाश

**९)** मोक्षमार्गाच्या प्राप्तीसाठी मनाच्या ––– आवश्यकता असते.
अ) एकाग्रतेची ब) चंचलतेची
क) दृढतेची ड) भेदविज्ञानाची

**१०)** जीवो उवओगमओ अमुति ––– सदेह परिणामो।
भोत्ता संसारत्थो सिद्धो सो –––।।
अ) धम्मा – गमणसह्यादीणेयं ब) कत्ता – विस्ससोड्ढगई
क) काला – जीवादीणं ड) आदा – बादरसहमेहंदी

**११)** तप, श्रुत व व्रतामध्ये लीन होण्याचा उपदेश ––– सिद्धीसाठी आहे.
अ) संसाराच्या ब) स्वतंत्रतेचा
क) ध्यानाच्या ड) परतंत्रतेचा

**१२)** अज्ञानी संसारी जीव इष्टानिष्ट भाव करतो, रागद्वेष करतो. परमध्यानाच्या सिद्धीसाठी हे विकारीभाव ––– आहेत.
अ) साधक ब) बाधक
क) हितकारी ड) उपकारक

**प्र.२ भाषातंर करा. (कोणतेही चार)** १२

**अ)** अट्ठ चदु णाणदंसण सामण्णं जीवलक्खणं भणियं।
ववहारा सुद्धणया सुद्धं पुण दंसणं णाणं।।

**ब)** अज्जीवो पुण णेओ पुग्गल धम्मो अधम्म आयासं।
कालो पुग्गल मुत्तो रुवादि गुणो अमुति सेसा दु।।

**क)** अणुगुरुदेहपमाणो उवसंहारप्पसप्पदो चेदा।
असमुहदो ववहारा णिच्चयणयदो असंखदेसो वा ।।

**ड)** वण्ण रसा पंच गंधा दो फासा अट्ठ णिच्चया जीवे।
णो संति अमुति तदो ववहारा मुत्रि बंधादो।।

**इ)** मग्गणगुणठाणे हिं य चउदसहिं हवंति तह असुद्धणया।
विण्णेया संसारी सव्वे सुद्धा दु सुद्धणया।।

**ई)** पुढवी जलते उवाउवणप्फदी विविहथावरेइंदी।
विगतिगचदुपंचवरवा तसजीवा होंति संखादी।।

**प्र.३ टीपा लिहा. (कोणत्याही दोन)** १२

**अ)** भावास्त्रव व द्रव्यास्त्रव

**ब)** व्यवहार सम्यग्दर्शन व सम्यक्चारित्र स्प्ष्ट करा.

**क)** पंचपरमेष्ठी

**ड)** मंगलचरणात कोणाला नमस्कार केला आहे?

**इ)** नेमिचंद्राचार्याचा परिचय

**प्र.४ दीर्घोत्तरी प्रश्न. (कोणताही एक)** १२

**अ)** सात तत्वांचे वर्णन करा.

**किंवा**

**ब)** पुद्गल द्रव्याचे पर्याय सांगा. अजीव द्रव्याचे भेद सांगा.

**प्र.५ दीर्घोत्तरी प्रश्न** १२

सहा द्रव्यांचे अस्तिकाय स्वरूप स्पष्ट करा. (कालणु अस्तिकाय का नाही?)

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

**एम.ए (Prakrit) (सत्र - I) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा:**
**ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५**
**Prakrit Language & Literature: Research Methodology (230119105)**

वार, दिनांकः गुरूवार, ०६-११-२०२५ कमाल गुणः ६०
वेळः दुपारी ०३:०० ते ०५:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ योग्य पर्याय निवडा.** **१२**

**१)** ––– म्हणजे सोडवण्यासाठी समोर आलेला प्रश्न होय.
अ) गृहितक ब) अहवाल लेखन
क) तथ्य विश्लेषण ड) संशोधन समस्या

**२)** नेहमीच्या दैनंदिन जीवनात येणारे व संशोधन संबंधित उपयुक्त ठरणारे सुसंगत घटना अथवा माहिती म्हणजे ––– होय.
अ) गृहितक ब) अहवाल
क) तथ्य ड) संशोधन

**३)** वर्तमान अफ़ग़ान, मध्य आशिया व निया प्रदेशातील शिलालेखाच्या प्राकृत भाषेचे संशोधन करणेसाठी या लिपिचे अध्ययन करावे लागेल.
अ) वट्टेळुत्तु ब) देवनागरी
क) खरोष्टि ड) हळे कन्नड़

**४)** नैतिकता मानवी भावना असली तरी त्याच्या आधाराने संशोधन ––– उपयोगी होऊ शकते.
अ) अवास्तविक
ब) प्रभावी आणि भविष्यकालीन संदर्भासाठी
क) अर्थार्जन
ड) नोकरीसाठी

**५)** मध्ययुगीन प्राकृत मुक्तक रचना बहुतांश ––– प्राकृत भाषेत आहेत.
अ) महाराष्ट्री प्राकृत ब) पाली प्राकृत
क) निया प्राकृत ड) पैशाची प्राकृत

**६)** सम्राट खारवेल यांचे जीवन चरित्र ––– येथे उपलब्ध आहे.
अ) खंडगिरी शिलालेखात ब) गिरनार शिलालेखात
क) प्राकृत साहित्यात ड) संस्कृत नाटय साहित्यामध्ये

७) 'संशोधन' म्हणजे कोणत्याही ज्ञान शाखेत नविन तत्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तत्वे यांचे पुन्हा–पुन्हा परिक्षण करण्यासाठी केलेला ––– अभ्यास होय.

अ) पारंपारिक व रूढ़िवादी  ब) चिकित्सक व पद्धतशीर
क) व्यक्तिनिष्ठ व अतार्किक  ड) गणितीय व वैचारिक

८) आचार्य वीरसेन यांनी षटखंडागमावर ––– भाषा पद्धतीने टीका रचना केली.

अ) विकृत न्याय  ब) अजाकृपाण न्याय
क) मणि–प्रवाल न्याय  ड) सिद्धांत न्याय

९) अभ्यासक यांच्या मते प्राचीन महाराष्ट्र प्रदेशातील जनभाषा ही ––– प्राकृत असल्याचे मानले जाते.

अ) महाराष्ट्री प्राकृत  ब) पाली प्राकृत
क) निया प्राकृत  ड) पैशाची प्राकृत

१०) ज्या संकल्पना, सिद्धांत, निष्कर्ष स्वीकृत झालेले आहेत त्यांचे प्रामाण्य पुन्हा–पुन्हा तपासून पहाणे हे त्या अध्ययन विषयांच्या ––– कार्य आहे.

अ) अभ्यासकांचे  ब) निवृत्तांचे
क) विद्यार्थ्यांचे  ड) बालकांचे

११) ––– म्हणजे तथ्य, तत्वे अथवा एखादी गोष्ट शोधण्यासाठी करण्यात येणारी चिकित्सा किंवा सतत पद्धतशीर केलेले परिश्रम होय.

अ) संकल्पना  ब) सिद्धांत निष्कर्ष
क) संशोधन पद्धति  ड) चिकित्सा

१२) ––– म्हणजे प्रकाशित, अप्रकाशित व ग्रंथालयातिल जुने ग्रंथ, पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे व शोध निबंध यांचे वाचन करून त्यांची संशोधनात मांडणी करणे होय.

अ) प्रयोग  ब) प्रयोगशालिन
क) पुरातत्व स्थल  ड) साहित्यिक सर्वेक्षण

**प्र.२ टिपा लिहा. (कोणतेही चार)** १२

**अ)** नमुना निवडीच्या पायऱ्या
**ब)** दुय्यम तथ्ये
**क)** संशोधन पद्धती
**ड)** निरीक्षण पद्धतीचे गुण–दोष
**इ)** साहित्य सर्वेक्षण
**ई)** संशोधन आराखडा

**प्र.३ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १२

**अ)** चांगल्या संशोधन आराखडयाची वैशिष्टये स्पष्ट करा.

**ब)** संशोधन अहवालाचा आकृतीबंध स्पष्ट करा.

**क)** संशोधनाची व्यावहारिक उपयोगिता स्पष्ट करा.

**ड)** प्रतिदर्श (नमुना) निवड पद्धतीचे प्रकार स्पष्ट करा.

**प्र.४ सविस्तर उत्तरे लिहा. (कोणताही एक)** १२

**अ)** तथ्य संकलन व त्याचे प्रकार स्पष्ट करा.

**किंवा**

**ब)** माहितीचे स्वरूप, संकलन व त्याचे प्रकार स्पष्ट करा.

**प्र.५** संशोधन अहवालाचे स्वरूप व अंतर्भूत घटक व अहवालाचे प्रकार स्पष्ट करा. १२

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

# एम.ए (Prakrit) (सत्र - I) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा:
## ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५
## Prakrit Language & Literature: Research Methodology (230119105)

वार, तारीखः गुरूवार, ०६-११-२०२५ कमाल गुणः ६०

समयः दोपहर ०३:०० से ०५:३०

**सूचनाएँ :** १) सभी प्रश्न अनिवार्य है।
२) दाई और दिए अंक प्रश्न के पूर्ण गुण दर्शाते है।

**प्र.१ निम्नलिखित प्रश्नों के नीचे दिए गए पर्यायों में से सही पर्याय चुनकर वाक्य फिर से लिखिए।** १२

१) ––– अर्थात् हल किए जाने वाला प्रश्न है।
   अ) परिकल्पना  ब) रिपोर्ट लेखन
   क) तथ्य विश्लेषण  ड) अनुसंधान समस्या

२) सामान्य दैनिक जीवन में घटित होने वाली घटनाएँ या सूचनाएँ अनुसंधान के लिए उपयोगी ––– होते है।
   अ) परिकल्पना  ब) रिपोर्ट
   क) तथ्य  ड) अनुसंधान

३) वर्तमान अफगानिस्तान, मध्य एशिया और निया क्षेत्र के शिलालेखों की प्राकृत भाषा पर शोध करने के लिए इस लिपि का अध्ययन करना होगा।
   अ) वट्टेलुत्तू  ब) देवनागरी
   क) खरोष्ठी  ड) हले कन्नड़

४) यद्यपि नैतिकता एक मानवीय भावना है, पर इस आधारित शोध ––– उपयोगी हो सकता है।
   अ) अवास्तविक
   ब) प्रभावी और भविष्य के संदर्भ के लिए
   क) कमाई
   ड) रोजगार के लिए

५) मध्यकालीन प्राकृत मुक्तक रचनाएँ अधिकांशतः ––– प्राकृत भाषा में हैं।
   अ) महाराष्ट्री प्राकृत  ब) पाली प्राकृत
   क) निया प्राकृत  ड) पैशाची प्राकृत

**६)** सम्राट खारवेल की जीवनी ––– पर उपलब्ध है।
अ) खंडगिरी शिलालेख में    ब) गिरनार शिलालेख में
क) प्राकृत साहित्य में    ड) संस्कृत नाटक साहित्य में

**७)** 'अनुसंधान' का अर्थ ज्ञान की किसी भी शाखा में नए सिद्धांतो या तथ्यों की खोज करना और पुराने सिद्धांतों की फिर से जांच करना ––– अध्ययन है।
अ) पारंपारिक और रूढ़िवादी    ब) नैदानिक और व्यवस्थित
क) व्यक्तिपरक और अपरिमेय    ड) गणितीय और वैचारिक

**८)** आचार्य वीरसेन द्वारा षट्खंडागमपर भाष्य की रचना ––– भाषा पद्धति से की है।
अ) विकृत न्याय    ब) दयालु न्याय
क) मणि–प्रवाल न्याय    ड) सिद्धांत न्याय

**९)** विद्वानों के अनुसार प्राचीन महाराष्ट्र क्षेत्र की भाषा ––– प्राकृत मानी जाती है।
अ) महाराष्ट्री प्राकृत    ब) पाली प्राकृत
क) निया प्राकृत    ड) पैशाची प्राकृत

**१०)** स्वीकृत अवधारणाओं, सिद्धांतो, निष्कर्तों की वैधता की फिर से जांच करना अध्ययन के विषयों का ––– कार्य है।
अ) विद्वानु    ब) सेवानिवृत्त
क) छात्र    ड) बालकोंका

**११)** ––– का अर्थ है किसी तथ्य, सिद्धांत या वस्तु की खोज के लिए व्यवस्थित या निरंतर प्रयास।
अ) अवधारणा    ब) सिद्धांत निष्कर्ष
क) अनुसंधान पद्धति    ड) थेरेपी

**१२)** ––– का अर्थ प्रकाशित, अप्रकाशित और पुरानी पुस्तकों, पुस्तकों, पत्रिकाओं, समाचार पत्रों और शोध पत्रों को पढ़ना और अनुसंधान में व्यवस्थित करना ––– है।
अ) प्रयोग    ब) प्रयोग शालिन
क) पुरातत्व स्थल    ड) साहित्यिक सर्वेक्षण

**प्र.२ टिप्पणियाँ लिखिए। (६ में से ४)** १२

**अ)** प्रतिदर्श (नमुना) चयन का स्तर
**ब)** दुय्यम प्रदत्त
**क)** अनुसंधान पद्धती
**ड)** अवलोकन पद्धती के गुण दोष
**इ)** साहित्य सर्वेक्षण
**ई)** अनुसंधान की रूपरेखा

**प्र.३ संक्षेप में उत्तर लिखिए। (४ में से २)** १२

**अ)** अच्छे अनुसंधान रूपरेखा की विशेषताये स्पष्ट करे.

**ब)** अनुसंधान रिपोर्ट की रूपरेखा को स्पष्ट करे.

**क)** अनुसंधान की व्यावहारिक उपयोगिता स्पष्ट करे.

**ड)** प्रतिदर्श (नमुना) चयन पद्धतीके भेद स्पष्ट करे।

**प्र.४ निम्नलिखित प्रश्नों में से किसी एक प्रश्न का उत्तर लिखिए।** १२

**अ)** प्रदत्त संकलन एवं भेद को समझाइए।

**अथवा**

**ब)** प्रदत्तो के स्वरूप, संकलन एवं उसके भेद स्पष्ट करे।

**प्र.५** अनुसंधान रिपोर्ट प्रारूप और घटकों और रिपोर्ट के प्रकारों की व्याख्या करें। १२

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

# M.A. (Prakrit) (Semester - I) (New) (NEP CBCS) Examination: October/November – 2025
# Prakrit Language & Literature: Research Methodology (230119105)

Day & Date: Thursday, 06-11-2025 Max. Marks: 60
Time: 03:00 PM To 05:30 PM

**Instructions:** 1) All questions are compulsory.
2) Figures to the right indicate full marks.

**Q.2 Write Notes. (Any Four)** **12**
- **a)** Steps of Sample Selection
- **b)** Secondary Data
- **c)** Research Method
- **d)** Pros and Cons of observation Method
- **e)** Literature Review
- **f)** Research Design

**Q.3 Answer the following questions. (Any Two)** **12**
- **a)** Define Features of Research Design.
- **b)** Explain outline of Research Report.
- **c)** Explain the practical utility of the Research.
- **d)** Explain the types of sample selection method.

**Q.4 Answer the following questions in detail. (Any One)** **12**
- **a)** Explain data collection and its types.

**OR**

- **b)** Define nature of Data and Its types.

**Q.5 Answer the following question in detail.** **12**
Explain research report format and components and types of reports.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

# एम.ए (Prakrit) (सत्र - I) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा:
# ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५
# Prakrit Inscriptions (230119106)

वार, दिनांकः शनिवार, ०८-११-२०२५ कमाल गुणः ६०

वेळः दुपारी ०३:०० ते ०५:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** १२

१) जर व्यक्ती ––– असेल परंतु भावशुद्धी, सयंम व वैचारिक शुद्धता नसेल तर नीच जाणावा.
अ) मूर्ख ब) दानी
क) ज्ञानी ड) शहाणा

२) कक्कुक प्रस्तरलेखाच्या शिलालेखाची प्राकृत भाषा ––– मिश्रित आहे.
अ) हिंदी ब) संस्कृत
क) मारवाडी ड) पैशाची

३) खेमराजा स वढराज स भिखुराजा धर्मराजा या वाक्याचा प्रयोग ––– शिलालेखात आला आहे.
अ) हाथीगुंफा ब) गिरनार
क) घटियाल ड) बडली

४) सम्राट अशोकांच्या शिलालेखानुसार मंत्री, राजुक, प्रादेसिकांनी धर्म शिकवणीसाठी ––– दोरे काढावेत.
अ) दर पाच वर्षांनी ब) दर बारा वर्षांनी
क) दर सात वर्षांनी ड) दर नऊ वर्षांनी

५) सम्राट खारवेलाने आपल्या राजघराण्याच्या निवासासाठी ––– नावाचा प्रसाद बांधविला.
अ) राजगड ब) महाविजय
क) राजवंश ड) राजगृह

६) खारवेलाने द्वितीय वर्ष पश्चिमेस ––– राजांचा पराभव केला.
अ) राष्ट्रकूट ब) चालुक्य
क) चोल ड) सातकर्णी

७) सम्राट अशोक यांचा गिरनार शिलालेख ——— राज्यात आहे.
   अ) महाराष्ट्र   ब) राजस्थान
   क) गुजरात   ड) बिहार

८) सम्राट खारवेल हो ——— वंशातील पराक्रमी राजा होता.
   अ) चेदी   ब) मौर्य
   क) कुषाण   ड) चंदेल

९) सम्राट अशोकांच्या शिलालेखांमध्ये शिलालेखात उल्लेखित पासंड शब्दाचा अभिप्राय ——— हा आहे.
   अ) जमात   ब) जात
   क) पंथ   ड) टोळी

१०) सम्राट अशोकाच्या गिरनार शिलालेखात ——— परकीय राजाचा उल्लेख आला आहे.
   अ) नेपोलियन   ब) सिकंदर
   क) ॲांटिओक्स   ड) हिटलर

११) शहाबाजगढी आणि मनसेहरा येथील शिलालेख ——— लिपीत आहे.
   अ) ब्राह्मी   ब) खरोष्टी
   क) उर्दू   ड) हिंदी

१२) सम्राट अशोकांनी खर्च जमातीतील शिस्त हा ——— निर्देश दिला आहे.
   अ) राज्यशास्त्रीय   ब) अर्थशास्त्रीय
   क) समाजशास्त्रीय   ड) मानसशास्त्रीय

**प्र.२ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही चार)** १२

**अ)** हाथीगुंफा प्रस्तर लेखाची माहिती द्या.
**ब)** सम्राट खारवेल यांचे जीवनदर्शन.
**क)** देवानांपिय शब्द.
**ड)** कक्कुक यांचे जीवनदर्शना ची माहिती द्या.
**इ)** सम्राट अशोक यांच्या धर्मलिपि संबंधी लिहा.
**ई)** सम्राट खारवेल यांची लोकोपयोगी कामे सांगा.

**प्र.३ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १२

**अ)** घट्याल शिलालेखातील गाथांचा भावार्थ थोडक्यात सांगा.
**ब)** ब्राह्मी लिपीच्या स्वरूप सम्राट अशोकांच्या शिलालेखावरून स्पष्ट करा.
**क)** सम्राट खारवेल यांच्या कार्याचा आढावा घ्या.
**ड)** सम्राट अशोक यांच्या शिलालेखाचे ऐतिहासिक महत्त्व सांगा.

**प्र.४ सविस्तर उत्तर लिहा. (कोणताही एक)** १२

१) सम्राट अशोक यांचा जीवन परिचय व परकीय राजा विषयी माहिती द्या.

**किंवा**

२) सम्राट अशोक यांच्या शिलालेखातील भाषिक, सामाजिक व प्रशासकीय दृष्टिकोनातून शिलालेखाचे महत्त्व सांगा.

**प्र.५ सविस्तर उत्तर द्या.** १२

सम्राट अशोक आणि खारवेल यांच्या कार्याचा आढावा घ्या.

| **Seat No.** | |
|---|---|

**Set P**

# एम.ए. (Prakrit) (सत्र – I) (नवीन) (NEP CBCS) परीक्षाः
# ऑक्टोबर / नोव्हेंबर - २०२५
# Introduction to Prakrit Grammar (230119104)

वार, दिनांकः मंगळवार, ११-११-२०२५ कमाल गुणः ३०
वेळःदुपारी ०३:०० ते ०४:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ योग्य पर्याय निवडून वाक्य पुर्ण करा.** **०६**

१) प्राकृतमध्ये संयुक्त वर्णाच्या पूर्व वर्ण दीर्घ असेल तर त्याचे ––– रूप होते.
अ) लोप ब) हस्व
क) द्वित्व ड) आगम

२) प्राकृतमध्ये 'ऋ' च्या स्थानी ––– होतो.
अ) 'य' व 'र' ब) 'कृ' व 'वृ'
क) अ, इ, उ, रि ड) म, न, ण

३) प्राकृतमध्ये दोन महाप्राण वर्णांचे ––– होत नाही.
अ) अनुनासिक ब) संयुक्त
क) स्वर ड) अनुस्वार

४) 'प' वर्गीय पंचम नासिक्य वर्ण ––– हा आहे.
अ) ङ ब) ञ
क) ण ड) म

५) वर्गीय पंचम नासिक्य वर्णाच्या स्थानी ––– होतो.
अ) अनुस्वार ब) द्वित्व
क) वर्ग ड) स्वल्पविराम

६) प्राकृतमध्ये ध्वनी परिवर्तन ––– हे असे दोन प्रकारचे असते.
अ) स्वर व अनुनासिक ब) स्वर व व्यंजन
क) उष्म व दंत्य ड) मूर्धन्य व अनुस्वार

**प्र.२** **टीपा लिहा.** **०६**

**अ)** अनुनासिक
**ब)** विसर्ग
**क)** प्राकृत वर्णमाला
**ड)** स्वर परिवर्तन

**प्र.३** 'य' श्रुती बाबत थोडक्यात माहिती द्या. **०६**

**प्र.४** संयुक्त वर्ण व त्याच्या प्राकृत नियमावली बाबत विशेष माहिती थोडक्यात द्या. **१२**

**किंवा**

ध्वनी परिवर्तनः संक्षिप्त परिचय स्वर परिवर्तन

| **Seat No.** | |
|---|---|

**Set | P**

## एम.ए. (Prakrit) (सत्र – II) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा: ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५
## प्राकृत साहित्याचा इतिहास (230119201)

वार, दिनांक : मंगळवार, २८-१०-२०२५ कमाल गुण : ६०
वेळ: सकाळी ११:00 ते 0१:३0

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** १२

१) अपभ्रंश साहित्यात सर्गास ––– असे म्हणण्याचा उल्लेख 'साहित्यदर्पणात' विश्वनाथ यांनी केला आहे.
अ) अध्याय ब) कुडवक
क) उपसर्ग ड) वज्जा

२) प्राकृत भाषेची प्रवृत्ती सदा ––– दिसून येते.
अ) स्थिर ब) कठिण
क) अस्थिर ड) परिवर्तनशील

३) ध्वनी परिवर्तनाच्या दृष्टीने ––– सर्वात समृद्ध आहे.
अ) पैशाची ब) मागधी
क) महाराष्ट्री ड) अर्धमागधी

४) शाकारी–चांडाली–शाबरी यांचा ––– मध्ये उल्लेख आला आहे.
अ) भाषा ब) विभाषा
क) देशभाषा ड) ऋषीभाषा

५) मार्कंडेय यांनी अपभ्रंश भाषेचे ––– सूक्ष्म प्रकार मानले आहेत.
अ) १२ ब) २१
क) १४ ड) २७

६) संस्कृत नाटकात सामान्य पात्रे ——— भाषा बोलतात.
अ) संस्कृत ब) द्राविडी
क) महाराष्ट्री ड) प्राकृत

७) मालविकाग्निमित्र आणि विक्रमोर्वशीय या नाटकांची रचना ——— यांनी केली.
अ) भास ब) अश्वघोष
क) कालीदास ड) शूद्रक

८) अंतिम वाचना महावीर निर्वाणानंतर ९८० वर्षांनी ——— येथे झाली.
अ) वलभी ब) चंद्रगिरी
क) पाटलीपुत्र ड) मथुरा

९) अर्धमागधी आगमांचे पाठभेद आणि वाचना भेदांचा समन्वय ——— वाचनेत करण्यात आले.
अ) प्रथम पाटलीपुत्र ब) अंतिम वलभी
क) माथूरी ड) हाथिगुंफा

१०) नायिका–सखी आदि पात्रे ——— भाषांचा वापर करतात.
अ) मागधी ब) पैशाची
क) चांडाली ड) शौरसेनी

११) विश्वेश्वर यांनी ——— या सट्टकाची रचना केली.
अ) मृच्छकटिकम् ब) सिंगारमंजरी
क) चंदलेहा ड) आनंदसुंदरी

१२) नमिसाधु यांनी ——— प्राकृतास आर्ष प्राकृत असे म्हटले आहे.
अ) पाली ब) पैशाची
क) अर्धमागधी ड) महाराष्ट्री

**प्र.२ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही चार)** १२

**अ)** प्राकृत कोश संग्रह
**ब)** प्राकृत मुक्तक काव्ये
**क)** भवभुतींच्या नाटकातील प्राकृत
**ड)** मृच्छकटिकांमधील प्राकृत
**इ)** अर्धमागधी साहित्य
**ई)** प्राकृत खंडकाव्य

**प्र.३ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १२

**अ)** सट्टकांची माहिती द्या.

**ब)** अश्वघोष यांच्या नाटकातील प्राकृतची माहिती द्या.

**क)** महाराष्ट्री प्राकृत साहित्याची थोडक्यात माहिती द्या.

**ड)** प्राकृत चरितकाव्यांचे वर्णन करा.

**प्र.४ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणताही एक)** १२

**अ)** प्राचीन शौरसेनी ग्रंथांचा थोडक्यात परिचय द्या.

**ब)** काव्यसाहित्याच्या विविध प्रकारांचे व साहित्याची माहिती द्या.

**प्र.५ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.** १२

अपभ्रंश भाषेची वैशिष्ट्ये सांगून साहित्यविषयक माहिती द्या.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

# एम.ए. (Prakrit) (सत्र – II) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा: ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५
# प्राकृत काव्य (230119202)

वार, दिनांक : गुरूवार, ३०-१०-२०२५ कमाल गुणः ६०
वेळः सकाळी ११:०० ते ०१:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** १२

१) शास्त्रीय ——— कलात्मक प्रतिभेची सर्वोत्तम देणगी आहे.
शास्त्रीय ——— कलात्मक प्रतिभा की सर्वोत्तम देन है।
अ) खंडकाव्य ब) महाकाव्य
क) मुक्तककाव्य ड) चरितकाव्य

२) महाकाव्यामध्ये समस्त जीवनाचे चित्रण असते परंतु ——— मध्ये जीवनाच्या एक बाजूचे चित्रण असते.
महाकाव्यमे समस्त जीवन का चित्रण रहता है पर ——— में जीवन के पक्षका रहता है।
अ) चरितकाव्य ब) रसेतरमुक्तककाव्य
क) खण्डकाव्य ड) मुक्तककाव्य

३) ——— व ——— शब्दांमुळे आरंभकाळापासून काव्य साहित्याची रचना होत आहे.
——— और ——— शब्द से शुरूसेही काव्य साहित्य की रचना हो रही है।
अ) ललित व सुकुमार ब) रुपकात्मक व ऐतिहासिकता
क) कथात्मकता व छन्दोबद्धता ड) सर्गबद्धता व खण्डविभाजन

४) कुवलयमाला हे काव्य ——— आहे.
कुवलमाया ये काव्य ——— है।
अ) चरितकाव्य ब) महाकाव्य
क) मुक्तककाव्य ड) चम्पूकाव्य

५) कवि रामपाणीवाद यांनी ---,--- व मल्यालम भाषेत काव्यरचना केली आहे.
कवि रामपाणीवाद इन्होंने ---,--- और मल्यालम भाषामें काव्यरचना की है।
अ) संस्कृत, प्राकृत ब) प्राकृत, मराठी
क) मराठी, हिंदी ड) हिंदी, संस्कृत

६) मध्यदेशामध्ये विनिता नावाच्या नगरीत --- राजा राज्य करीत होता.
मध्यदेशमें विनिता नाम की नगरी में --- राजा राज्य करता था।
अ) वत्सलहाल ब) पार्श्वकुमार
क) दृढवर्मा ड) द्रोण

७) उद्योतनसूरी यांनी आपले गुरू --- यांच्याकडून न्याय, प्रमाण, धर्म याचे शिक्षण घेतले.
उद्योतनसूरी इन्होंने अपने गुरू --- इनसे न्याय, प्रमाण, धर्म का शिक्षण लिया है।
अ) जयवल्लभसूरि ब) जयसेनाचार्य
क) हरिभद्रसूरि ड) जिनदेवसूरि

८) जे काव्य अर्थ पर्यवसानसाठी परापेक्षी असत नाही त्यास --- म्हणतात.
जिस काव्य का अर्थ पर्यवसान के लिए परापेक्षी नही होता उसे --- कहते है।
अ) खण्डकाव्य ब) मुक्तक काव्य
क) महाकाव्य ड) चरितकाव्य

९) उवसग्गहर स्तोत्र या काव्याचे रचयिता --- आहेत.
उवसग्गहर स्तोत्र इस काव्य के रचयिता --- है।
अ) स्थूलिभद्र ब) क्षमाक्षमणमुनि
क) भद्रबाहु ड) जयभद्रसूरि

१०) चरितग्रंथात तीर्थंकर --- वर्णन मिळते.
चरितग्रंथ में तीर्थंकर --- वर्णन मिलता है।
अ) महाराजांचे ब) कुलकरांचे
क) गुरूंचे ड) महापुरूषांचे

११) विमलसूरि यांनी रामकथेवर आधारित --- ग्रंथ लिहीला.
विमलसूरिने रामकथापर आधारित --- ग्रंथ लिखा है।
अ) पउमचरियं ब) गउडवहो
क) कंसवहो ड) आदिवरचरिय

१२) राजा महेंद्रसिंह व राणी कूर्माचा मुलगा धर्मदेवता पूर्वभव वर्णन व वर्तमानभव वर्णन --- या काव्यात आहे.
राजा महेंद्रसिंह और राणी कूर्मा का पुत्र धर्मदेवता पूर्वभव वर्णन व वर्तमानभव वर्णन --- इस काव्य मे है।
अ) कुम्मापुत्तचरियं ब) भविसयत्तकहा
क) सुरसुन्दरिचरियं ड) सुपासनाहचरियं

**प्र.२ भाषांतर करा. (कोणतेही चार)** १२

**अ)** धम्मेण कुलं विउलं धम्मेण य दिव्वरूवमारोग्गं।
धम्मेण जए किती धम्मेण होइ सोहग्गं।।

**ब)** विविहकइविरइयाणं गाहाणं वरकुलाणि घेत्तूण।
रइयं वज्जालग्गं विहिणा जयवल्लहँ नाम।।

**क)** एक्को वि सहसारो ण देइ गन्तुं प आहिण वलं तो।
किं उण वाहाउलिअं लेअणजुअलं पिअअमाए।।

**ड)** जिअं जिअं मे णअणेहि जेहिदे सुजाअ– सुंदेर– गुणेक्क– मंदिरं।
पसण्ण पुण्णामअ – मोह – सच्छहं, मुहं पहासुज्जल मज्ज पिज्जए।।

**इ)** जइ सो तेणं चिअ उयणमेइ ता साह कि पयासेण।
वायाए जो विवज्जइ विसेण किं तस्स दिण्णेण।।

**ई)** तित्थयरा थ गणहरा चक्कहरा सबलवासुदेवा य।
अइबलिणी वि. न सक्का काउं आउस्स सन्धाणं।।

**प्र.३ उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १२

**अ)** प्राकृत मुक्तक काव्य वज्जालग्गं

**ब)** ळयाश्रय काव्याचा सारांश

**क)** गद्यपद्य मिश्रित चम्पुकाव्य

**ड)** कवि स्वयंभु

**प्र.४ अ)** पउमचरियं कथेचा सारांश लिहा. १२

**किंवा**

**ब)** सेतुबन्ध कथेचा सार लिहा.

**प्र.५** प्राकृत मुक्तक काव्याचे स्वरुप सांगून त्याची माहिती लिहा. १२

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

# एम.ए. (Prakrit) (सत्र – II) (नवीन) (NEP CBCS) परीक्षाः
# ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५
# शौरसेनी आगम (230119203)

वार, दिनांक : शनिवार, ०१-११-२०२५ कमाल गुण: ६०

वेळ: सकाळी ११:०० ते १:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ योग्य पर्याय निवडा.** १२

**१)** कामकदा इत्थिकदा दोसा असुचितगुड्ढसेवा य। संसग्गादोसा वि य करंति इत्थोसु –––।

अ) रमइ ब) वेरग्गं

क) कोहं ड) णमइ

**२)** भ. महावीरांचे निर्वाण ––– साली झाले.

अ) इ. स. ५९९ ब) इ. स. पु. ५९९

क) इ. स. ५२७ ड) इ. स. पु. ५२७

**३)** श्रुतकेवलींची संख्या ––– आहे.

अ) ३ ब) ११

क) ४ ड) ५

**४)** अर्थात्मक व विचारात्मक स्वरूप असलेल्या रचनेस ––– म्हणतात.

अ) भावश्रुत ब) वेदांतिक

क) ग्रंथसंपदा ड) द्रव्यश्रुत

**५)** आगमातील अंतिम अंग असलेल्या भागास ––– म्हणतात.

अ) स्थानांग ब) आचारांग

क) व्याकरणसूत्र ड) दृष्टीवाद

**६)** तीर्थंकर शलाका मुद्यपुरूषांच्या जन्मदिनाच्या वेळीच्या लक्षणांचे विवेचन ज्यामध्ये केले आहे त्यास ––– पुर्व म्हटले जाते.

अ) विद्यानुवाद ब) क्रियावाद

क) प्राणावाद ड) कल्याणवाद

७) सर्व पुर्व साहित्याचे ज्ञान अन्तिमत ––– यांना होते.
   अ) निर्युक्तिकार   ब) श्रुतकेवली भद्रबाहु
   क) रिदेव   ड) गुणधर

८) तीर्थंकार महावीर द्वारा उपदेशित, गौतम गणधर द्वारा अर्थरूपात ऐकलेल्या शब्दांत ग्रथित पंरपरेने आलेल्या त्या कष्ठ–श्रवण परंपरेतील रचित साहित्यास ––– म्हणतात.
   अ) वेद   ब) धर्मसाहित्य
   क) श्रुत   ड) त्रिपिटक

९) साधुआचार याचे वर्णन प्रश्नोत्तर शैलीत ––– अंगात केले आहे.
   अ) आयारंगसुत्त   ब) सुदयड सुत्त
   क) ठाणंगसुत्त   ड) विक्या पण्णत्ती

१०) आत्मप्रवाद पुर्व च्या सहाय्याने द्रव्यानुयोग साहित्यात समयसाराची रचना सर्वप्रथम ––– यांनी केली.
   अ) कुंदकूंद   ब) यतिवृषभ
   क) गणधर   ड) धरसेन

११) कम्मपयडि आणि शतकचुर्णि यांची रचना आचार्य ––– यांनी ११ वे शतकाच्या पुर्वी केली आहे.
   अ) वीरसेन   ब) शिवशर्म
   क) गुणचंद्र   ड) गुभभद्र

१२) भावसंग्रह यांची रचना ––– यांनी शतकात केली.
   अ) वीरसेन   ब) गुणसेन
   क) देवसेन   ड) जिनसेन

**प्र.२ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही चार)** **१२**

**अ)** तह जाण अहिंसाए विणा ण सीलाणि ठंति सत्वाणि।
तिस्सेव रकखणट्ठं सीलाणी वदीव सस्सस्स।।

**ब)** जीवो कसायबहुलो संतो जीवाण घायणं कुणइ।
सो जीववहं परिहरइ सया जो णिज्जियकसाओ।।

**क)** मारणसीलो कुणादि हु जीवाणं रकखसुव्व उव्वेगं।
संबंधिणो वि ण य विस्सं भं मारिंतए जंति।।

**ड)** कामुम्मत्तो संतो अंतो डज्झदि य कामचिंताए।
पीदो त कलकलो सो रदग्गिजाले जलंतम्मि।।

**इ)** जम्हा असच्चवयणादिएहिं दुकखं परस्स होदित्ति।
तप्परिहारो तम्हा सव्वे वि गुणा अहिंसाए।।

**ई)** दुक्खेण लभदि माणुस्सजादिमदिसवणदंसणाचरितं।
दुकखज्जियसामण्णं मा जहसु तणं व अगणंतो।।

**प्र.३ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १२

**अ)** षट्खंडागम साहित्यावरील टिकाग्रंथांची माहिती द्या.

**ब)** अंगबाह्य आगमांविषयी चर्चा करा.

**क)** भगवती आराधना ग्रंथात वर्णित कामविकाराने पिडित मनुष्याचे वर्णन करा.

**ड)** आ. वीरसेन यांचे साहित्यिक योगदान विषयक चर्चा करा.

**प्र.४ सविस्तर उत्तरे लिहा. (कोणताही एक)** १२

**अ)** अध्यात्म आणि ध्यानयोग संबंधी द्रव्यानुयोग साहित्याचे विस्तृत वर्णन करा.

**ब)** चारही अनुयोग साहित्याचे विस्तृत वर्णन करा.

**प्र.५ सविस्तर उत्तर लिहा.** १२

भगवती आराधनेचा परिचय देऊन पंचमहाव्रतासंबंधीचे वर्णन करा.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

**एम.ए. (Prakrit) (सत्र – II) (नवीन) (NEP CBCS) परीक्षाः**
**ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५**
**हस्तलिखित ग्रंथ संशोधन पद्धती (230119204)**

वार, दिनांकः मंगळवार, ०४-११-२०२५ कमाल गुणः ३०
वेळः सकाळी ११:०० ते १२:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** **०६**

१) पुरातन हस्तलिखितांचे वाचन हे ––– याचे प्रथम ध्येय आहे.
अ) हस्तलिखित विज्ञान ब) लेखक
क) पाठक ड) कोणतेही नाही.

२) 'मृण्मय अभिलेख' याचे तात्पर्य ––– आहे.
अ) लोह धातुच्या पात्रादिवर उत्कीर्ण
ब) मातीने बनलेल्या पात्रावर उत्कीर्ण
क) शिलेवर उत्कीर्ण
ड) कोणतेही नाही

३) ताडपत्र यांच्यावर ––– शाईचा वापर आढळतो.
अ) काजळ ब) माती
क) केसर ड) कोणतेही नाही

४) प्राचीनकाली पांढरा रंग ––– यास घासून बनविले जात असे.
अ) काजळ ब) पुष्प
क) लाकुड ड) शंख

५) एक लिपि आहे जी आतापर्यंत वाचली गेलेली नाही असा एक अपवाद असलेली लिपी ––– आहे.
अ) सिंधु लिपि ब) ब्राम्ही लिपी
क) खरोष्ठी लिपि ड) कोणतीही नाही

६) पुष्कळ अशा लिपिंच्या जननीच्या रूपामध्ये ––– ही लिपी जाणली जाते.
अ) खरोष्ठी लिपि ब) ब्राम्ही लिपि
क) सिंधु लिपि ड) चित्र लिपि

**प्र.२ टिपा लिहा. (कोणत्याही दोन)** **०६**

**अ)** हस्तलिखिते यांच्या पाठांतराची कारणे
**ब)** श्रुतलेखन
**क)** प्रतिलिपिकरण
**ड)** लिपिकार

**प्र.३** लिप्यासन म्हणजे काय हे स्पष्ट करून कठोर व मृदु लिप्यासनाची काही उदाहरणे दया. **०६**

**प्र.४ अ)** हस्तलिखिते म्हणजे काय हे स्पष्ट करून संशोधकास केले जाणारे कोणते प्रश्न आहेत? **१२**

**किंवा**

**ब)** हस्तलिखित–प्राप्ति आणि संबंधित प्रयत्न त्या साठी आवश्यक क्षेत्रे, माध्यमे याविषयी चर्चा करा.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

## एम.ए. (Prakrit) (सत्र – II) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा: ऑक्टोबर/नोव्हेंबर – २०२५
## हरिभद्रसुरी आणि त्यांचे साहित्य (230119207)

वार, दिनांक: शुक्रवार, ०७-११-२०२५ कमाल गुण: ६०

वेळ: सकाळी ११:०० ते १:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** १२

१) क्रोध, मान इत्यादिंनी पीडित परलोकास न मानणाऱ्यास सन्मानाचा विरोध करणाऱ्यास ––– श्रोता म्हटले.
अ) मध्यम ब) उत्तम
क) अधम ड) धर्म

२) हरिभद्रसूरि द्वारे रचित ––– हे व्यंग्य काव्यातले अनुपम रचना आहे.
अ) समराइच्चकहा ब) धूर्ताख्यान
क) सावयधम्मविही ड) उपदेशपद

३) त्रिलोकातील सर्व पदार्थ यथायोग्य जाणणाऱ्या वीतरागी कर्मरहित साधकास ––– म्हटले आहे.
अ) कर्ता ब) जिनेंद्र
क) गुणी ड) सुगत

४) हरिभद्रसूरीचा खंडन–मंडन करणारा आणखी एक ––– दर्शन ग्रंथ होय.
अ) शास्त्रीयवार्तासमुच्चय ब) जंबुद्वीपप्रज्ञप्ति
क) यशोधरचरित ड) न्यायविनिश्चय

